मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# धरण क्षेत्रात मुसळधार पाऊस; पवना धरण 45.81 टक्के भरले

## धरण परिसरात संततधार पाऊस कायम; पवना नदी दुथडी भरून वाहू लागली, नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरणाच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू असून धरणातील पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ होत आहे. आज (दि. ६ जुलै) दुपारी १२ वाजेपर्यंत पवना धरण ४५.८१ टक्के भरले असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

धरण परिसरात संततधार पाऊस सुरू असल्याने धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक होत आहे. परिणामी पवना नदी दुधडी भरून वाहत असून नदीकाठच्या भागांमध्ये सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान, जोरदार पावसामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक रस्त्यांवर पाणी साचले असून काही ठिकाणी वाहतूक बंद करण्यात आली आहे. नदी आणि नाल्यांच्या पाण्याची पातळी वाढल्याने अनेक भागांमध्ये पाणी शिरल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. प्रशासनाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत असून नागरिकांनी अनावश्यक घराबाहेर पडणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

हवामान विभागाने पुढील काही तासांतही जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त केल्याने धरणातील पाणीसाठ्यात आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि स्थानिक यंत्रणा सतर्क असून नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



### पवना धरणातील पाणीसाठ्यात वेगाने वाढ

**» गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पिंपरी-चिंचवडला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरणातील पाणीसाठ्यात मोठी वाढ झाली आहे. रविवारी (६ जुलै) दुपारी १२ वाजेपर्यंत धरण ४५.८१ टक्के भरले असून धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरू आहे. परिणामी पवना नदी दुथडी भरून वाहत आहे. हवामान विभागाने पुढील काही तासांतही जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त केला असून धरणातील पाणीसाठा आणखी वाढण्याची शक्यता आहे. प्रशासनाने नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहावे आणि अधिकृत सूचनांचे पालन करावे, असे आवाहन केले आहे.**

# आस्मानी संकटात भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी जपली माणुसकी!

## रहाटणीतील पूरस्थितीत राम मंदिरात अडकलेल्या नागरिकांच्या मदतीला धाव; स्वतः घटनास्थळी थांबून बचावकार्याला दिला वेग

**पिंपरी | प्रतिनिधी**

संततधार मुसळधार पावसामुळे पवना नदीच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाल्याने रहाटणी परिसरातील ऐतिहासिक राम मंदिरात पूराचे पाणी शिरले. अचानक वाढलेल्या पाण्यामुळे मंदिर परिसरात लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसह अनेक भाविक अडकून पडले. या घटनेची माहिती मिळताच भाजप पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष तथा स्थानिक नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे यांनी क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेत बचावकार्याची सूत्रे हाती घेतली.

पूरस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून श्री. काटे यांनी तात्काळ महापालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन पथकाला आणि अग्निशामक दलाला घटनास्थळी पाचारण केले. नदीची पाणीपातळी सातत्याने वाढत असतानाही त्यांनी स्वतः घटनास्थळी उपस्थित राहून संपूर्ण बचाव मोहिमेवर लक्ष ठेवले.

शत्रुघ्न काटे यांच्या मार्गदर्शनाखाली आपत्कालीन पथकाने बोटी आणि आवश्यक सुरक्षा साहित्याच्या साहाय्याने मंदिरात अडकलेल्या नागरिकांना सुखरूप बाहेर काढले. लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना प्राधान्य देत त्यांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यात आले. तसेच परिसरातील इतर धोकादायक ठिकाणांचाही आढावा घेऊन आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या.

या वेळी श्री. काटे यांनी नागरिकांना नदीकाठच्या परिसरात जाणे टाळण्याचे, प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आणि कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तात्काळ संबंधित यंत्रणेशी संपर्क साधण्याचे आवाहन केले.

यावेळी बोलताना शत्रुघ्न काटे म्हणाले, "पावसाचा जोर लक्षात घेता प्रशासन पूर्णपणे सतर्क असून बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, घाबरून न जाता प्रशासनाला सहकार्य करावे आणि सुरक्षित ठिकाणी राहावे. कोणत्याही आपत्कालीन मदतीसाठी आम्ही चोवीस तास नागरिकांच्या सेवेसाठी उपलब्ध आहोत."

या संकटाच्या काळात लोकप्रतिनिधी म्हणून केवळ सूचना देण्यापुरते न थांबता स्वतः घटनास्थळी उपस्थित राहून बचावकार्याला दिशा दिल्याने रहाटणी परिसरातील नागरिकांनी श्री. शत्रुघ्न काटे आणि त्यांच्या सहकाऱ्यांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. आस्मानी संकटाच्या काळात दाखविलेली तत्परता, संवेदनशीलता आणि माणुसकीची भावना यामुळे शत्रुघ्न काटे यांच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.



> **"नागरिकांच्या जीवापेक्षा मौल्यवान काहीच नाही. पूरस्थितीवर प्रशासनासोबत आम्ही सातत्याने लक्ष ठेवून आहोत. अडकलेल्या प्रत्येक नागरिकाला सुरक्षित बाहेर काढण्यासाठी सर्व यंत्रणा युद्धपातळीवर कार्यरत आहेत. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, नदीकाठच्या धोकादायक भागात जाणे टाळावे आणि कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तात्काळ संपर्क साधावा. संकटाच्या या काळात आम्ही प्रत्येक नागरिकासोबत खंबीरपणे उभे आहोत."**
>
> **- शत्रुघ्न (बापू) काटे, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# उद्योगनगरी ठप्प! 59 ठिकाणी पाणी तुंबले; 35 प्रमुख रस्ते बंद, 11 पूल पाण्याखाली

## वल्लभनगर, एचए चौक, साई चौक, पुनावळे, ताथवडे आणि मामुर्डी येथील अंडरपास पूर्णपणे पाण्याखाली

**पिंपरी | प्रतिनिधी**

मुसळधार पावसामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील जनजीवन सोमवारी पूर्णपणे विस्कळीत झाले. शहरातील तब्बल ५९ ठिकाणी पाणी तुंबल्याने ३५ प्रमुख रस्ते वाहतुकीसाठी बंद करावे लागले, तर ११ पूल पाण्याखाली गेल्याने अनेक भागांचा संपर्क तुटला. कार्यालयीन वेळेतच अचानक रस्ते बंद झाल्याने वाहनचालकांची मोठी गैरसोय झाली. पर्यायी मार्गांवरही प्रचंड वाहतूक कोंडी झाल्याने नागरिकांना तासन्तास अडकून पडावे लागले.

वल्लभनगर, एचए चौक, साई चौक, पुनावळे, ताथवडे आणि मामुर्डी येथील अंडरपास पूर्णपणे पाण्याखाली गेल्याने ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले. त्यामुळे वाहनचालकांना ऐनवेळी मार्ग बदलावा लागला. अनेक दुचाकी आणि चारचाकी वाहने पाण्यात बंद पडली. काही वाहनचालकांनी पाण्याचा अंदाज न आल्याने अंडरपासमध्ये प्रवेश केला; मात्र वाहने बंद पडल्याने ती ढकलत बाहेर काढावी लागली.



### ११ पूल पाण्याखाली; संपर्क तुटला

**» सततच्या पावसामुळे शहरातील ११ पूल पाण्याखाली गेल्याने अनेक भागांचा संपर्क तुटला. दिघी-आळंदी परिसरातील इंद्रायणी नदीवरील चार पूल बंद झाल्याने आळंदी, मरकळ, तुळापूर, धानोरी आणि चाकणकडे जाणारी वाहतूक थांबली. निगडी विभागातील धनेश्वर, बटरफ्लाय आणि केशवनगर पूलही पाण्याखाली गेल्याने नागरिकांना मोठा वळसा घालून प्रवास करावा लागला. प्रशासनाने सुरक्षेच्या कारणास्तव पूल आणि धोकादायक मार्ग बंद ठेवत नागरिकांना अनावश्यक प्रवास टाळण्याचे आवाहन केले..**

रिव्हर व्ह्यू चौक, अहिंसा चौक, भक्ती-शक्ती चौक, नाशिक फाटा, संत तुकारामनगर, चिखली, मोशी, भोसरी, रहाटणी, पिंपळे सौदागर, आळंदी, चाकण आणि देहूरोड परिसरातही मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याने वाहतुकीचा वेग अत्यंत मंदावला. सुरक्षेच्या कारणास्तव वाहतूक पोलिसांनी अनेक मार्ग बंद करून वाहतूक पर्यायी मार्गांवर वळविली. मात्र पर्यायी मार्गांची क्षमताही अपुरी पडल्याने तेथेही मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली.

शाळांकडून सुटीबाबतचे संदेश उशिरा मिळाल्याने पालकांना मुलांना घरी आणण्यासाठी मोठी धावपळ करावी लागली. कामावर जाणारे कर्मचारी, औद्योगिक वसाहतीतील कामगार, मालवाहतूक करणारे ट्रकचालक तसेच रुग्णालयांकडे जाणाऱ्या नागरिकांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. अनेक ठिकाणी रुग्णवाहिकांनाही वाहतूक कोंडीतून मार्ग काढताना अडचणी आल्या.

### पावसामुळे बंद झालेले प्रमुख रस्ते

**» मुसळधार पावसामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील तब्बल ३५ प्रमुख रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले. वल्लभनगर, एचए चौक, साई चौक, पुनावळे, ताथवडे आणि मामुर्डी येथील अंडरपास पाण्याखाली गेल्याने वाहनांची मोठी कोंडी झाली. रिव्हर व्ह्यू चौक, अहिंसा चौक, भक्ती-शक्ती चौक, नाशिक फाटा, संत तुकारामनगर, चिखली, मोशी, भोसरी, रहाटणी आणि पिंपळे सौदागर परिसरातही पाणी साचल्याने वाहतूक विस्कळीत झाली. पर्यायी मार्गांवरही प्रचंड गर्दी झाल्याने नागरिकांना तासन्तास वाहतूक कोंडीत अडकून राहावे लागले.**

दिघी-आळंदी परिसरात इंद्रायणी नदीवरील चार पूल पाण्याखाली गेल्याने आळंदी, मरकळ, तुळापूर, धानोरी आणि चाकणकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे बंद झाली. तर निगडी विभागातील धनेश्वर, बटरफ्लाय आणि केशवनगर पूल बंद झाल्याने चिंचवड, भक्ती-शक्ती आणि किवळे परिसरातील नागरिकांना मोठा वळसा घालून प्रवास करावा लागला.

चिखली आणि मोशी परिसरातील अनेक मुख्य रस्त्यांवर गुडघाभर पाणी साचल्याने वाहनांचा वेग अत्यंत मंदावला. पुणे-नाशिक महामार्गावरील वाकी फाटा येथे दोन्ही लेन बंद करून वाहतूक भाम फाटा मार्गे वळविण्यात आली. त्यामुळे महामार्गावरही वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या.

# देहूत इंद्रायणी नदी दुथडी भरून; पालखी सोहळ्याच्या स्वागताला पूरस्थिती

## संत तुकाराम महाराजांच्या पालखी प्रस्थानाच्या पार्श्वभूमीवर मुसळधार पावसामुळे देहू परिसर जलमय; घाट भागात सतर्कतेचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याचे मंगळवारी (दि. ७) श्रीक्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान होणार असल्याने देहूनगरीत भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे. पायी दिंड्यांचे आगमन, टाळ-मृदंगाचा गजर आणि ज्ञानोबा-तुकाराम नामाचा अखंड नामघोषामुळे संपूर्ण परिसरात नवचैतन्य संचारले आहे. अशातच गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे इंद्रायणी नदी दुथडी भरून वाहू लागली असून, जणू पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठीच नदी ओसंडून वाहत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.



सततच्या पावसामुळे इंद्रायणी नदीला पूर आला असून, पित्ती धर्मशाळा, संत गाडगे महाराज धर्मशाळा परिसरात पाणी शिरले आहे. तसेच, पुंडलिक मंदिर परिसरही पाण्याने वेढले गेले आहे. या पार्श्वभूमीवर देहूनगरीत दाखल झालेल्या हजारो वारकरी भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, अनेक भाविक पावसात भिजत भक्तीचा आनंद लुटताना दिसत आहेत. दरम्यान, नदीच्या वाढत्या पाणी पातळीमुळे संभाव्य धोका लक्षात घेता देहू नगरपंचायतीने नागरिक व भाविकांना घाट परिसरात जाणे टाळावे, असे आवाहन केले आहे. तसेच, सतर्कतेच्या सूचना देण्यासाठी विविध ठिकाणी फलक लावण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे

### वारकऱ्यांना सतर्कतेचे आवाहन

**» गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे देहूतील इंद्रायणी नदीला पूर आला असून, इंद्रायणी दुथडी वाहू लागली आहे. पित्ती धर्मशाळा, संत गाडगे महाराज धर्मशाळा या परिसरात पुराचे पाणी शिरले असून पुंडलिक मंदिर पाण्याने वेढले गेले आहे. त्यामुळे संभाव्य धोका लक्षात घेता वारकऱ्यांनी सतर्क राहावे, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. यासाठी तातडीने सूचना फलक लावण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली**

पूरामुळे इंद्रायणी घाटावरील महिला वारकऱ्यांसाठी उभारण्यात आलेल्या कपडे बदलण्याच्या खोल्या तसेच अनेक फिरती शौचालये पाण्याखाली गेली आहेत. त्यामुळे वारकऱ्यांनी अधिक खबरदारी घ्यावी, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. दिवसभर असलेल्या पावसामुळे देहू परिसरातील वाहतूक संथ गतीने सुरू होती.

# वृक्षछाटणीच्या निविदा रखडल्या; पावसात पुणेकरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

## महापालिकेने दीड कोटींचा निधी दिला तरी कामे सुरु नाहीत; झाडे कोसळणे, वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटनांत वाढ

**पुणे | प्रतिनिधी**

प्रत्येकी १० लाख याप्रमाणे वृक्षसंवर्धनासाठी १५ क्षेत्रीय कार्यालयांसाठी मिळून दीड कोटी रुपये देण्यात आले आहेत. मात्र, त्याच्या निविदाच काढण्यात न आल्याने वृक्ष छाटणीचे काम अनेक ठिकाणी रखडले आहे. झाडांच्या अनियंत्रित वाढलेल्या फांद्यांमुळे विजेच्या तारांना धक्का लागत असून, त्यामुळे वीजपुरवठा खंडीत होण्याच्या प्रकारांत वाढ झाली आहे. मार्च महिन्यात अंदाजपत्रक सादर झाल्यानंतर त्यातच ही तरतूद करण्यात आली होती.

त्यानुसार २४ मार्च रोजी ही रक्कम प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाकडे वर्ग करण्यात आली; परंतु त्यानंतर पावसाळ्याच्या तोंडावर वृक्ष छाटणी, धोकादायक फांद्या काढणे, धोकादायक वृक्ष काढणे या सगळ्या गोष्टींसाठीच्या निविदा काढून पावसाळ्याच्या आत ही सर्व कामे होणे अपेक्षित होते. मात्र, यातील एकही गोष्ट झाली नसल्याचे दिसून येत आहे. नुकतेच बाजीराव रस्त्यावरील अभिनव चौकात मोठे झाड उन्मळून पडले. एका विद्यार्थिनीच्या अंगावर हे झाड पडले, सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही.



### झाडे कोसळण्याच्या घटनांनी वाढली चिंता

» अभिनव चौक, मंगलमूर्ती चौक आणि नवश्या मारुती मंदिर परिसरात झाडे कोसळण्याच्या घटना घडल्याने महापालिकेच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अभिनव चौकात झाड विद्यार्थिनीवर पडले, तर नवश्या मारुतीजवळ झाड कोसळून एका वृद्ध महिलेचा मृत्यू झाला. मंगलमूर्ती चौकात पालखीसाठी उभारलेल्या मंडपावर झाड पडल्याने मोठी दुर्घटना टळली. सध्या सुरू असलेल्या संततधार पावसामुळे झाडे आणि फांद्या कोसळण्याचा धोका अधिक वाढला असून तातडीने वृक्षछाटणी करण्याची मागणी जोर धरत आहे.

याशिवाय मंगलमूर्ती चौकातही ऐन पालख्या येण्याच्या काही दिवस आधीच पहाटेच्या सुमारास झाड पडले. हे झाड पालखीसाठी टाकलेल्या मंडपावर पडले. तेथेही सुदैवाने कोणीच नव्हते, हीच घटना पालखी मुक्कामाच्या काळात घडली असती, तर याची कल्पनाच करवत नाही. याशिवाय नवश्या मारुती मंदिराजवळही झाड पडून एक वृद्ध महिला दगावल्याची घटनाही घडली आहे. सध्या सुरू असलेल्या संततधार पावसानेही झाडे, फांद्या पडण्याच्या अनेक घटना घडत आहेत, तसेच वाढलेल्या फांद्या विजेच्या तारांना घासल्याने तारा तुटून वीजपुरवठा खंडीत होण्याचे प्रकार शहरात घडले आहेत.

### निधी उपलब्ध, पण कामे ठप्प

» महापालिकेने वृक्षसंवर्धन आणि धोकादायक झाडांच्या छाटणीसाठी १५ क्षेत्रीय कार्यालयांना प्रत्येकी १० लाख रुपये, असा एकूण दीड कोटी रुपयांचा निधी मार्च महिन्यात उपलब्ध करून दिला. २४ मार्च रोजी निधी वर्गही करण्यात आला. मात्र, पावसाळ्यापूर्वी आवश्यक निविदा न काढल्याने वृक्षछाटणी, धोकादायक फांद्या हटविणे आणि जीर्ण झाडे काढण्याची कामे रखडली आहेत. परिणामी शहरातील अनेक भागांत झाडांच्या फांद्या विजेच्या तारांवर पडून वीजपुरवठा खंडित होण्याच्या

> “क्षेत्रीय कार्यालयांना लॉकिंग दिले आहे. त्यांनी त्यांच्या स्तरावर या निविदा काढणे आवश्यक आहे. काही जणांनी त्या काढल्या आहेत. ज्यांच्या राहिल्या आहेत, त्यांना लवकर कार्यवाही करण्यासंदर्भातील आदेश पत्राद्वारे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी दिले आहेत. गेल्या आठवड्यात झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत यावर चर्चा झाली आहे.”
>
> - डॉ. अशोक घोरपडे, उद्यान अधीक्षक, पुणे महापालिका

# चाकणमध्ये ढगफुटीसदृश पाऊस; पुणे-नाशिक महामार्ग ठप्प

## खेड तालुक्यात मुसळधार पावसामुळे पूरसदृश स्थिती; चाकण एमआयडीसी परिसरात जनजीवन विस्कळीत

**पुणे | प्रतिनिधी**

खेड तालुक्यात मुसळधार पावसाने अक्षरशः दाणादाण केली आहे. संपूर्ण तालुक्यात ढगफुटीसारखा पाउस सुरु आहे. सोमवारी ( दि. ६ जुलै) सकाळी पुणे नाशिक महामार्गावर अनेक ठिकाणी प्रचंड पाणी आल्याने महामार्ग ठप्प झाला आहे.

प्रमुख औद्योगिक व व्यापारी केंद्र असलेल्या चाकण शहरात आणि आसपासच्या परिसरात मुसळधार पाऊस कोसळत आहे. या संततधार पावसामुळे चाकणमधील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून अनेक भागांत पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. मुसळधार पावसामुळे नाले आणि ओढे अनियंत्रित झाले असून अने ठिकाणी दुकाने, घरे रस्ते पाण्याखाली गेले आहेत.



या पावसाचा सर्वाधिक फटका वाहतूक व्यवस्थेला बसला आहे. पुणे-नाशिक महामार्गासह चिंबळी फाटा, स्पायसर चौक, आळंदी फाटा आणि चाकण मधील तळेगाव चौक, आंबेठाण चौक, वाकी सुम्ब्रे नगर भागात कंबरेपर्यंत महामार्ग पाण्याखाली गेले आहेत.

त्यामुळे या प्रमुख मार्गांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. चाकण एमआयडीसी परिसरातील अंतर्गत रस्त्यांची कामे सुरू असल्याने आणि पाण्याचा योग्य निचरा न झाल्याने चाकरमानी व कामगारांना कामावर पोहोचण्यासाठी तासनतास वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.

महामार्गावर पाणी साचल्याने वाहतुकीचा वेग प्रचंड मंदावला आहे. मुसळधार पाउस सुरूच असून पाण्याचा निचरा होत नसल्याची स्थिती निर्माण झाली आहे. चाकण शहराची तुंबई झाल्याचे स्थानीक नागरिकांनी सांगितले आहे.

### महामार्गावर वाहतूक विस्कळीत

» खेड तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे पुणे-नाशिक महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. चिंबळी फाटा, स्पायसर चौक, आळंदी फाटा, तळेगाव चौक, आंबेठाण चौक आणि वाकी-सुंब्रे नगर परिसरात रस्त्यांवर कंबरेपर्यंत पाणी साचल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. चाकण एमआयडीसी परिसरातील अंतर्गत रस्त्यांवरील कामे सुरू असल्याने आणि पाण्याचा निचरा न झाल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली. कामगार, विद्यार्थी आणि नोकरदारांना तासन्तास वाहतूक कोंडीत अडकून राहावे लागले असून प्रशासनाने नागरिकांना अत्यावश्यक कामाशिवाय प्रवास टाळण्याचे आवाहन केले आहे.

# लोणावळा, मावळात पूरस्थिती; 24 तासांत 625 मिलिमीटर पाऊस

## 24 तासांत लोणावळ्यात 625 मिमी पाऊस; इंद्रायणी दुथडी भरुन वाहतेय, दरडी कोसळल्या, अनेक भाग जलमय

**पुणे | प्रतिनिधी**

लोणावळा, मावळ तालुक्यात गेल्या २४ तासांत मुसळधार पाऊस सुरू आहे. इंद्रायणी नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. इंद्रायणी नदी दुथडी भरून वाहत आहे. लोणावळा शहर परिसरात २४ तासात ६२५ मिलिमीटर पाऊस झाला.

पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याने ओढ्यांवरील पूल बंद करण्यात आले. नागरिकांनी नदीपात्राच्या बाजूला जाऊ नये, पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी दक्ष रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पवन मावळातील ओझर्डे गावातील रस्ता वाहून गेला आहे. लोणावळ्यातील पांगोळी स्मशानभूमीजवळ दरड कोसळली आहे. खंडाळ्यातील काही भागांत डोंगर कपारातील माती वाहून आली आहे. लोणावळा शहरातील सर्व रस्त्यांवर पाणी साचले आहे सोसायटी, तसेच घरांमध्ये पाणी शिरल्याच्या घटना घडल्या.

टाटा धरण पूर्ण भरल्याने भिंतीवरून पाणी लोणावळा शहरात शिरले आले आहे. विसापूर किल्ल्याच्या पायथ्याला असलेल्या पाटण गावात एका घरावर दरड कोसळल्याने कुटुंब अडकले. प्रशासन, तसेच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य सुरू केले. मुंबई-पुणे जुना महामार्गावर नायगाव साते येथे पाणी साचल्याने वाहने अडकून पडली आहेत. पवनानगर बाजारपेठ, तसेच वडगाव मावळ बाजारपेठेत पाणी शिरले आहे.

मुंबई -पुणे रेल्वेमार्गावर खंडाळा घाटात मंकी हिल येथे दरड कोसळली. त्यानंतर मुंबई-पुणे रेल्वे सेवा बंद करण्यात आली. कामाचा पहिला दिवस असल्याने अनेकांनी नेहमीप्रमाणे पुणे रेल्वे स्थानकावर सोमवारी सकाळी गर्दी केली होती. रेल्वे गाड्या, तसेच एसटी सेवा बंद केल्याने नोकरदारांची गैरसोय झाली.

संततधार पावसामुळे खंडाळा घाट, तसेच मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर दरडी कोसळण्याच्या धोका असल्याने संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, तसेच जुना मुंबई-पुणे महामार्ग वाहतूकीस बंद करण्यात आला. दोन्ही बाजूंनी या मार्गांवरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. लोणावळ शहर, तसेच घाटमाथ्यावर जोरदार पाऊस सुरू असल्याने द्रुतगती मार्गावरील मिसिंग लिंकच्या बोगद्याजवळ दरड कोसळली. मिसिंग लिंकसह द्रुतगती मार्गावर पाणी साचल्याने वाहतूक बंद करण्यात आली. पुण्याहून ताम्हिणी घाटमार्गे माणगावकडे जाणारी वाहतूक बंद करण्यात आली आहे.



### लोणावळ्यात २४ तासांत ६२५ मिमी पावसाची नोंद

**» लोणावळा आणि मावळ तालुक्यात मुसळधार पावसाने कहर केला असून, गेल्या २४ तासांत लोणावळा शहरात तब्बल ६२५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. सततच्या पावसामुळे इंद्रायणी नदी दुथडी भरून वाहत असून पूरस्थिती निर्माण होण्याचा धोका वाढला आहे. ओढ्यांवरील पूल खबरदारीचा उपाय म्हणून बंद करण्यात आले आहेत. अनेक भागांत रस्ते जलमय झाले असून घरांमध्ये पाणी शिरल्याच्या घटना घडल्या आहेत. प्रशासनाने नागरिकांना नदीकाठ आणि पूरग्रस्त भागांपासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे.**

### पुणे जिल्ह्यात रेड अलर्ट

**» पावसाचा वाढता जोर लक्षात घेऊन पुणे जिल्हा प्रशासनाने रेड अलर्ट जारी केला असून पुणे शहर आणि जिल्ह्यातील शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. घाट क्षेत्र आणि द्रुतगती मार्गावर दरडी कोसळण्याचा धोका कायम असल्याने अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळावा, नदीपात्र, ओढे आणि डोंगर उताराजवळ जाणे टाळावे तसेच प्रशासन व पोलिसांच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.**

### रस्ते आणि रेल्वे वाहतूक विस्कळीत

**» संततधार पावसामुळे लोणावळा, खंडाळा आणि घाटमाथा परिसरात अनेक ठिकाणी दरडी कोसळल्या आहेत. मुंबई-पुणे रेल्वेमार्गावरील मंकी हिल येथे दरड कोसळल्याने रेल्वे सेवा तात्पुरती बंद करण्यात आली. तसेच मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, जुना मुंबई-पुणे महामार्ग आणि ताम्हिणी घाटातील वाहतूकही सुरक्षेच्या कारणास्तव थांबविण्यात आली आहे. नायगाव साते, पवनानगर आणि वडगाव मावळ परिसरात पाणी साचल्याने वाहतुकीवर मोठा परिणाम झाला असून अनेक वाहने अडकून पडली आहेत.**

# आषाढी वारीत पहिल्यांदाच ‘अशी’ हायटेक सुविधा!

## आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी घेतला आढावा; घरातून बाहेर पडल्यापासून परत जाईपर्यंत वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी सरकार घेणार.

**पुणे | प्रतिनिधी**

श्री संत ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराज आषाढी वारीची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. वारी मार्गावरील वाहनांची आरटीओकडून मोफत तपासणी करण्यात येणार आहे. मार्गावर विद्यूत सुरक्षेला प्राधान्य देण्याच्या सूचना दिल्या असून आषाढी यात्रेवेळी पंढरपूरमध्ये अत्यावश्यक रुग्णांसाठी एअर ॲम्बुलन्स सज्ज ठेवण्यात येणार आहे. यात्रेवेळी पंढरपूरमध्ये भाविकांची मोठी गर्दी होते. यावेळी वारकऱ्यांना आरोग्य सुविधा तात्काळ मिळाव्यात यासाठी सुसज्ज रुग्णवाहिका, बाईक ॲम्बुलन्सचा वापर होते.

यावर्षी अत्यावश्यक रुग्णांसाठी एअर ॲम्बुलन्सची सुविधा ठेवण्यात येणार असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांना पालखी मार्ग, तळांवर देण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक संजय काटकर, राज्यातील आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, महापालिका आरोग्य अधिकारी,

वैद्यकीय अधीक्षक आणि तालुका आरोग्य अधिकारी दृकश्राव्य माध्यमाद्वारे उपस्थित होते. आबिटकर म्हणाले की, भाविक वारीसाठी घरातून बाहेर पडल्यानंतर पुन्हा घरी पोहोचेपर्यंत आरोग्याच्या सर्व आवश्यक सुविधा पुरवण्याचे नियोजन आरोग्य विभागाने केले आहे. वारी कालावधीत भाविकांना डिजिटल आरोग्य सुविधा देण्यात येणार आहेत. आरोग्य संपन्न वारी व वारी सहाय्य या माध्यमातून पालखी मार्गावर भाविकांना तात्काळ आरोग्य सुविधा मिळणार आहे. यासाठी प्रत्येक आरोग्य कर्मचारी व आशा सेविका यांच्यामार्फत माहिती दिली जाईल.



### वाहनांची मोफत तपासणी

**» वारीत सहभागी होणाऱ्या सर्व वाहनांची पुणे आरटीओ तांत्रिक तपासणी करणार आहे. वारीतील सहभागी मालवाहू गाड्या, बस आणि सर्व लहान-मोठ्या वाहनधारकांनी तात्काळ तपासणी करून घ्यावी, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी केले आहे. दोन्ही पालखी मार्गांवर भाविक, प्रवासी आणि जड वाहने मोठ्या प्रमाणावर असतात. वाहनांमध्ये अचानक तांत्रिक बिघाड होऊन अपघात घडू नयेत तसेच रस्त्यात वाहने बंद पडून वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी सर्व वाहनांची दोन ठिकाणी तपासणीची व्यवस्था केली आहे.**